**महाराष्ट्र शासन**

क्र.संकीर्ण-०८१८/प्र.क्र.२२३/१४अे
कृषि व पदुम विभाग, हुतात्मा
राजगुरू चौक, मंत्रालय,मुंबई-३२
दिनांक:- १७ नोव्हेंबर,२०१७

प्रति,

संचालक (फलोत्पादन),
कृषी आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय:- मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्राच्या जलदगती विकासासाठी घोषित केलेल्या उपायायोजनांचा विशेष कार्यक्रम, २०१८ ची अंमलबजावणी त्वरीत करण्याबबत.**

मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्राच्या जलदगती विकासासाठी उपायायोजनांचा विशेष कार्यक्रम, २०१८, दि. २० जुलै, २०१८ रोजी विधानमंडळात जाहीर करण्यात आला आहे. सदर विशेष कार्यक्रम/योजनांमध्ये, "मराठवाडा व विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये ठिबक सिंचन योजनेच्या अनुदानाच्या मर्यादेत ८०% इतकी वाढ करणे" या योजनेचा समावेश आहे.

त्यानुसार, मराठवाडा व विदर्भातील जिल्हयामध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत ४५% ते ५५% एवेजी शेतकऱ्यांना ८०% अनुदान द्यावे लागेल. त्यासाठी राज्यहिश्श्याच्या अनुदानाच्या रक्कमेत वाढ करावी लागेल. राज्य हिश्श्याच्या निधी रक्कम जिल्हा विकास निधीमधून उपलब्ध करुन द्यावी लागेल. त्यासाठी, सन २०१८-१९ या वर्षात सद्या विदर्भ व मराठवाड्यातील जिल्ह्यामध्ये जिल्हा विकास निधी अंतर्गत जिल्हानिहाय किती तरतूद उपलब्ध आहे. आणि ८०% वाढीव अनुदानानुसार जिल्हानिहाय अतिरिक्त किती निधी उपलब्ध करुन दयावा लागेल. याबाबतची माहिती तात्काळ शासनास पाठविण्याची विनंती आहे.

(श्रीकांत आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Letter २०१८.१४A